मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चंद्रपूर यांचे कार्यालय

जा ही र नि वि दा

चंद्रपूर न्यायीक जिल्ह्यातील मुख्यालय व तालुका न्यायालये जिल्हा न्यायाधीश–1, वरोरा, दिवाणी न्यायालय (क.स्तर) वरोरा, भद्रावती, चिमुर, बल्लारपुर, राजुरा, कोरपना, गोंडपिपरी, पोंभुर्णा, मुल, सावली, सिंदेवाही, नागभिड, व ब्रम्हपुरी येथील न्यायालयात पुरविण्यांत आलेल्या अग्निशमन यंत्राची टेस्टींग व रिफीलिंग आणि दुरूस्ती करण्याकरीता मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चद्रंपूर यांचे आदेशान्वये शासना मान्यता फायर केअर सर्व्हीसेस चे अधिकृत इच्छुक पुरवठादार/दुकानदार यांचेकडून दरकरार करण्याकरीता करण्याकरीता या कार्यालयाचे नोटीसबोर्डवर आणि जिल्हा न्यायालयाची वेबसाईट **http://chandrapur.dcourts.gov.in** या संकेत स्थळावर जाहिर निविदा प्रसिध्द करून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चंद्रपूर यांचे आदेशान्वये स्थानिक दुकानदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. निविदा **मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चंद्रपूर** यांचे नावे खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन सिलबंद लिफाफ्यात **दिनांक 23/11/2026** चे कार्यालयीन वेळ संपेपर्यंत कार्यालयात दाखल करावी. तसेच निविदेचे पॉकीटवर **''अग्नीशमन यंत्राची दुरूस्ती आणि टेस्टींग व रिफीलींग करण्याबाबतची निविदा''** असे स्पष्ट नमुद करावे.

चंद्रपूर जिल्हा न्यायालयातील व तालुका न्यायालयातील अग्निशमन यंत्राची माहिती खालीलप्रमाणे आहे.

टेस्टींग व रिफीलिंग आणि दुरूस्ती करावयाच्या अग्निशमन यंत्राची यादी

अ. क.	न्यायालयाचे नांव	रिफींलींग करावयाचे अग्निशमन यंत्रांची संख्या								
		ABC 4 Kg.	ABC 4.5 Kg.	ABC 5 Kg.	ABC 6 Kg.	AB C 10 Kg.	W/co2 (9 Liter)	Co2 (4.5 Kg)	ईतर उपलब्ध अग्निशमन यंत्र	एकुण
1	जिल्हा न्यायालय, चंद्रपूर	––	––	––	73	––	4	34	––	111
2	जिल्हा न्यायाधीश–1, वरोरा	––	––	––	8	–	5	––	––	13
3	दिवाणी न्यायालय,(क.स्तर), वरोरा.	––	––	––	––	5	5	––	––	10
4	दिवाणी न्यायालय, भद्रावती	––	––	––	17	4	5	6	––	32
5	दिवाणी न्यायालय, चिमुर	2	10	––	19	5	––	––	––	36
6	दिवाणी न्यायालय, बल्लारपुर	––	1	––	4	––	4	––	––	9
7	दिवाणी न्यायालय, राजुरा	––	12	––	24	15	5	––	––	56
8	दिवाणी न्यायालय, कोरपना	––	––	––	9	––	––	––	––	9
9	दिवाणी न्यायालय, पोंभुर्णा	––	2	––	6	1	5	––	––	14
10	दिवाणी न्यायालय, गोंडपिपरी	––	––	1	21	––	4	10	––	36
11	दिवाणी न्यायालय, मुल	––		––	27	––	4	12	––	43
12	दिवाणी न्यायालय, सावली	––	––	––	9	––	4	1	––	14
13	दिवाणी न्यायालय, सिंदेवाही	––		––	––	3	4	––	––	7
14	दिवाणी न्यायालय, नागभिड	––		––	24	––	3	13	––	40
15	दिवाणी न्यायालय, ब्रम्हपुरी	––	––	––	14	2	2	5	––	23
	एकुण ..	**2**	**25**	**1**	**255**	**35**	**54**	**81**	––	**453**

मुदतीनंतर प्राप्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

चंद्रपूर
दिनाकः 07 / 11 / 2026

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर.

अटी व शर्ती

(1) निविदेचे लिफाफ्यावर **"अग्नीशमन यंत्राची दुरूस्ती आणि टेस्टींग व रिफीलींग करण्याबाबतची निविदा"** असे नमुद करून निविदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे नावाने दिनांक 23–11–2026 चे कार्यालयीन वेळ संपेपर्यंत अथवा त्यापूर्वी जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे प्राप्त होईल या बेताने सादर करावी.

(2) निविदेचे लिफाफ्यावर सादर करणा–या निविदाधारकांनी त्यांचा संपुर्ण पत्ता, संपर्क कमांक व ई–मेल पत्ता स्पष्ट अक्षरात नमुद करावा.

(3) चंद्रपूर न्यायीक जिल्ह्यातील मुख्यालय व तालुका न्यायालये जिल्हा न्यायाधीश–1, वरोरा, दिवाणी न्यायालय (क.स्तर) वरोरा, भद्रावती, चिमुर, बल्लारपुर, राजुरा, कोरपना, गोंडपिपरी, पोंभुर्णा, मुल, सावली, सिंदेवाही, नागभिड, व ब्रम्हपुरी येथील न्यायालयात पुरविण्यांत आलेल्या अग्निशमन यंत्राची टेस्टींग व रिफीलिंग आणि दुरूस्ती करावयाची असल्यामुळे त्याठिकानी अग्निशमन यंत्र टेस्टींग व रिफीलिंग आणि दुरुस्तीकरीता आणने व पोहोचविणे याकरीता अतिरीक्त वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.

(4) **दिनांक 23–11–2026 चे कार्यालयीन वेळ संपेपर्यंत प्राप्त झालेल्या निविदा जिल्हा न्यायालय, चंद्रपूर खरेदी समिती व सादर केलेल्या निविदाधारकांसमक्ष दि. 25–11–2026 रोजी दुपारी 2:30 वाजता उघडण्यात येईल. तेव्हा सादर केलेल्या निविदाधारकांनी जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.**

(5) कोणतेही कारण न दर्शविता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांना राहिल आणि ते राखीव राहील.

(6) निविदा उघडण्यांत आल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदांपैकी कमी दराची निविदाच विचारात घेतल्या जाईल.

(7) निविदा सादर करताना निविदाधारकांनी खालील कागदपत्रांच्या प्रति सोबत जोडणे अनिवार्य आहे. (शॉप ॲक्ट चा परवाना, आधारकार्ड, पॅनकार्ड, बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत आणि रद्य केलेला धनादेश व ईतर आवश्यक कागदपत्रे)

(8) जिल्हा न्यायालयात किमान तिन निविदा प्राप्त झाल्यानंतरच निविदा उघडण्यात येतील.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर.